# ७. चंद्रावर मी गेलो तेव्हा...

- ऐका. म्हणा. वाचा.



चंद्रावर मी गेलो तेव्हा
नव्हता दिवस नव्हती रात्र
प्रकाश आणि अंधाराची
रिमझिम होती मात्र.

चंद्रावर मी गेलो तेव्हा
कापूस कापूस झालो
तरंगत तरंगत इकडे तिकडे
आरामात हिंडलो.



चंद्रावर मी गेलो तेव्हा
पृथ्वी उगवली होती
तिच्या निळ्या चांदण्यात
पौर्णिमा हसत होती.

चंद्रावर मी गेलो तेव्हा
ससा-बिसा नव्हता
आर्मस्ट्राँगच्या पायाचा
मोठ्ठा ठसा होता!

**– राजन साटम**

शब्दार्थ : **कापूस कापूस होणे** – हलके हलके वाटणे, तरंगणे. **पायाचा ठसा** – पावलाची खूण.

## स्वाध्याय



प्र. १. प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) चंद्रावर कवीला काय दिसले ?

(आ) चंद्रावर गेल्यावर कवीची स्थिती कशी झाली ?

(इ) चंद्रावरून कवीला पृथ्वी कशी दिसली?

(ई) चंद्रावरचा ठसा कशाचा होता?

**प्र. २. या कवितेत आलेले 'ससाबिसा', 'इकडे तिकडे', 'तरंगत तरंगत' हे शब्द वापरून वाक्ये लिहा.**

**प्र. ३. एखाद्या महिन्यातील पौर्णिमेच्या दिवसाचे निरीक्षण करा व तुमचा अनुभव पाच वाक्यांत लिहा.**

**प्र. ४. तुम्हांला चंद्रावर जाण्याची संधी मिळाली, तर तुम्ही काय काय पाहाल ते पाच वाक्यांत लिहा.**

**प्र. ५. 'ससाबिसा' या जोडशब्दात 'ससा' हा अर्थपूर्ण शब्द आहे, तर 'बिसा' या शब्दाला अर्थ नाही. या प्रकारचे खालील जोडशब्द वाचा.**

**उपासतापास, टंगळमंगळ, शिराबिरा, शेतीभाती, अर्धामुर्धा, बारीकसारीक, दगडबिगड, झाडबिड, जाडाभरडा, घरबिर, गोडधोड, शेजारीपाजारी, आडवातिडवा, भांडीकुंडी.**

**प्र. ६. कापूस होणे म्हणजे हलकेफुलके होणे यासारखे शब्दसमूह शोधा व लिहा.**

**उपक्रम :** आंतरजालावरून आर्मस्ट्राँगबद्दल माहिती मिळवा व लिहून काढा.

- **खालील वाक्ये वाचा. 'मोर' शब्दाऐवजी योग्य सर्वनामे वापरून वाक्ये लिहा.**



**उदा., मोर सुंदर आहे.**

१. मोर राष्ट्रीय पक्षी आहे.

२. मोराचा पिसारा सुंदर असतो.

३. मोराच्या डोक्यावर तुरा असतो.

४. मोर पावसाची चाहूल लागताच थुईथुई नाच करतो.

५. मोराला रंगीबेरंगी पिसारा असतो.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा.**

(१) .............. बाजारातून भाजी आणूया.
(तुम्ही, आपण, आम्ही)

(२) आज .............. खूप गाणी गायली.
(तिला, ती, आम्ही)

(३) रमेशने .............. आईला जेवायला वाढले.
(स्वतः, तिला, त्याला)

- **खालील शब्द वाचा.**

मी, ही, जी, तू, धू, पू, ऊ, पी, बी, जू, ती या शब्दांना एकाक्षरी शब्द म्हणतात. एकाक्षरी शब्दांतील इ-कार किंवा उ-कार दीर्घ उच्चारला जातो म्हणून तो **दीर्घ** लिहितात. 'नि' हा एकच शब्द असा आहे की जो एकाक्षरी असूनही **ऱ्हस्व** लिहितात.

खालील शब्दांपासून वाक्ये लिहा.

**मी** **तू** **ही** **पी** **जी**

- **वाचा व समजून घ्या.**

एकदा मी व आई मामाच्या गावाला निघालो होतो. बसस्टॅण्डवर आलो. गाडी सुटायला वेळ होता, म्हणून आम्ही बाकावर बसलो होतो. आमच्या शेजारी एक कुटुंब म्हणजे दोन मुले, त्यांची आई व आजी होती. त्यांच्याकडे खूप सामान होते. कोणत्या गाड्या आल्या, कुठे निघाल्या, कुठं थांबल्या या विषयीच्या सूचना स्पीकरवर सांगत होते. या सूचनेनंतर प्रवाशांना सामान सांभाळा, अंगावरचे दागिने सांभाळा,लहान मुलांकडे लक्ष द्या अशा सूचनाही देत होते. तेवढ्यात आमच्या शेजारी बसलेल्या कुटुंबातील सर्वजण बसच्या दिशेने घाईघाईने निघाले. सामान खूप असल्याने बाजूला असलेली पिशवी तिथेच राहिली. पिशवी तिथेच राहिली हे लक्षात येताच बसस्टॅण्डवरच्या गर्दीतून वाट काढत काढत ती पिशवी घेऊन मी ते कुटुंब कुठे दिसते का ते पाहत होतो. त्यांचे नाव ना गाव मला काहीच माहीत नव्हते. त्यांच्यातील लहान मुलगी व आजी बसच्या खिडकीतून बाहेर पाहत होत्या. त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले. तिने दादा म्हणून हाक मारली. ती बराचवेळ माझ्या शेजारी बसून राहिल्याने तो आवाज माझ्या लक्षात आला. मी त्या दिशेने धावलो. तोपर्यंत आजी गाडीतून खाली उतरून आल्या होत्या. मी त्यांना पिशवी दिली. त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला. कमरेचे दहा रूपये काढून माझ्या हातावर ठेवू लागल्या. मी नको नको म्हणत होतो. ''अरे बाळा, मी तुझी आजी ना. तू आजीसाठी धावत पळत आलास, मग खाऊसाठी आजीने दिलेल्या पैशांना नाही म्हणायचे नसते.''असे म्हणत आजीने खूप मायेने माझ्या तोंडावरून हात फिरवला.

## भाषेची ओळख

मराठी भाषेत 'च' आणि 'ज' ही दोन अक्षरे अशी आहेत की त्यांचे उच्चार भिन्न भिन्न केले जातात. काही शब्दांमध्ये 'च'चा उच्चार 'च' आणि काही शब्दांमध्ये 'च्य' असा होतो; तर 'ज'चा उच्चार 'ज' आणि 'ज्य' असा होतो.

खालील शब्द वाचा.

| 'च' उच्चार | 'च्य' उच्चार |
|---|---|
| चौदा | चहा |
| चौक | चार |
| चाक | चक्र |
| चावणे | चिंधी |
| चूल | चिमणी |

| 'ज' उच्चार | 'ज्य' उच्चार |
|---|---|
| जगणे | जग |
| जाग | जादू |
| मांजर | जेवण |
| जोरात | जिना |
| जुना | वजीर |

**शिक्षकांसाठी :** या पृष्ठावर एका मुलाचा बसस्टॅण्डवरील अनुभव दिलेला आहे. विद्यार्थ्यांकडून त्याचे प्रकट वाचन करून घ्यावे. त्यांना आलेले अनुभव व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करावे.